# पुणे जिल्हा परिषद पुणे
## वेलस्ली रोड,कॅम्प पुणे - 411001
## बांधकाम विभाग- दक्षिण

दुरध्वनी क्रं. E-mail:- zppuneworkssouth@gmail.com

भाग-१

ई-लिलाव **सूचना** क्र. **०१ सन २०२४-२५**

पुणे जिल्हा परिषद पुणे अंतर्गत पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाची इमारत **पात्र खाजगी, सार्वजनिक,सहकारी बँकेला भाडेपट्टा तत्वावर** देण्याकरीता माहिती पत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे विहीत पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक अर्जदारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

अभिलेख कक्ष इमारत वाटपासाठी ई-लिलाव वेळापत्रक खालीलप्रमाणे-

| तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|
| वृत्तपत्रात प्रसिध्दीची तारीख | दि.२६/०७/२०२४ |
| संकेतस्थळावर प्रसिध्दीची तारीख | दि.२९/०७/२०२४ |
| संकेतस्थळावर बोलीदार नोंदणी ( सुरुवात तारीख व वेळ) | दि.२९/०७/२०२४ सकाळी १०.०० वा. |
| संकेतस्थळावर बोलीदार नोंदणी ( शेवटची तारीख व वेळ) | दि.३१/०७/२०२४ दुपारी ०१.०० वा |
| निवीदा दस्तऐवज डाउनलोड करणे (सुरुवात तारीख व वेळ) | दि. ३१/०७/२०२४ दुपारी ०२.०० वा |
| निवीदा दस्तऐवज डाउनलोड करणे ( शेवटची तारीख व वेळ) | दि.०१/०८/२०२४ दुपारी १२.०० वा |
| निविदा फॉर्म फीची रक्कम व बयाणा रक्कम संकेतस्थळावर दस्तऐवज अपलोड करणे | दि.०१/०८/२०२४ दुपारी ०३.०० वा |
| अपलोड केलेल्या दस्तऐवजांचा तांत्रिक छाननी | दि.०१/०८/२०२४ |
| तांत्रिक दृष्टया पात्र बोलीदाराची संकेतस्थाळावर घोषणा | दि.०१/०८/२०२४ |
| संकेतस्थळावर थेट ई-लिलाव सुरवात | दि.०२/०८/२०२४ दुपारी ०३.०० वा |
| संकेतस्थळावर थेट ई-लिलाव बंद दिनांक | दि.०२/०८/२०२४ दुपारी ०४.०० वा |

टिप क्र. **१ उपरोक्त तारखा सुधारित झाल्यास त्याची माहिती केवळ संकेतस्थळावर उपलब्ध होईल.**

अ. ई. लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व पात्र बँकांनी ई -लिलाव पोर्टल https://eauctionzppune.in/ वर नोंदणी करणे सक्तीचे असून सर्व प्रक्रिया "https://eauctionzppune.in/" याच वेबसाईटवर राबविली जाणारा आहे.लिलाव शुल्क, बयाणा,रक्कमेचा भरणा नोंदणीकृत बँकेच्या धनाकर्षाव्दारे करणे आणि इतर सलग्न बाबींचीही पुर्तता करावी लागेल.

आ. इच्छुक लिलावदारांची दस्तऐवज व अन्य बाबींची पडताळणी करुन त्यांना प्रत्यक्ष ई- लिलाव प्रक्रिये मध्ये सहभागी होण्यासाठी पात्र करण्यात येईल केवळ पात्र खाजगी, सार्वजनीक,सहकारी बँकेला लाईव्ह ई- लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल.

इ. सर्व अर्जदारांनी ई- लिलाव प्रक्रिये संबंधी सर्व कागदपत्रे ऑनलाईनच सादर करणे आवश्यक आहे.

ई. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक पुणे जिल्हा परिषद , पुणे यांचा राहील. तसेच सदरची इमारत भाडेतत्वावर देण्याच्या किंवा नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक पुणे जिल्हा परिषद , पुणे यांना राहील.

उ. सदर ई. लिलाव प्रक्रियेसंबंधी सूचना सविस्तर अटी व शर्ती "https://eauctionzppune.in/" या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहेत.

ऊ. ई- लिलाव प्रक्रियेत काही तांत्रिक अडचण आल्यास सदरची प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक पुणे जिल्हा परिषद , पुणे. यांना राहील.

| | | |
|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **कार्यकारी अभियंता** | **अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** |
| **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** |

**भाग-२**

**ई- लिलावाकरिता सूचना-**

पुणे जिल्हा परिषद पुणे तर्फे पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाचे इमारतीचे पात्र खाजगी,सार्वजनिक, सहकारी बँक यांना (Online) ई- लिलाव पध्दतीने **०५** वर्षाच्या भाडेपट्टा तत्वावर वाटप करण्याकरीता निविदा मागविणेत येत आहेत.

( विशेष सूचना- सदर माहिती पत्रकातील अर्ज, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून अर्ज भरावा. नंतर याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.)

वाटपासाठी प्रस्तावीत असलेल्या इमारतीची, इच्छुक बँकांनी समक्ष पाहणी करून सदर ई. लिलाव प्रक्रियेत सहभागी व्हावे.

- **वाटपासाठी उपलब्ध असलेल्या अभिलेख कक्षाच्या इमारतीचा तपशिल पुढील प्रमाणे-**

**(Area in Sq Feet)**

| uid Up | Carpet Area | Open Space | | Total Space |
|---|---|---|---|---|
| | | Garden Space | Parking Space | |
| २०२५ | १७९३.५६ | २४९० | ६२४५ | १०७६० |

| | एकुण अधिमूल्य रु. | अर्जासोबत भरावयाची बयाणा रक्कम | फॉर्म फी (रु) |
|---|---|---|---|
| | ६८२७२/- | २०००००/- | ३०००/- |

सदर फॉर्म फी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, जिल्हा परिषद पुणे येथे जिल्हा परिषद निधी खाते क्र. ०२९००२९००००००००१ मध्ये भरणा करून चलन सदरच्या पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे

नोंदणी शुल्क/ फॉर्म फीची रक्कम वरील प्रमाणे असून ती परत केली जाणार नाही.

**आवश्यक कागदपत्रांचा तपशील-**

अ)- https://eauctionzppune.in/ या संकेतस्थळावर अपलोड करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशिल.

१. भाग ५ मधील परिशिष्ठ १ प्रमाणे लिलावादारांची संपुर्ण माहीती.
२. भाग ५ मधील परिशिष्ठ २ प्रमाणे लिलावादाराचे घोषणापत्र.
३. पॅन कार्डची साक्षांकित छायाप्रत
४. लिलावधारक बँकेचे नोंदणीप्रमाणपत्र साक्षांकित प्रत.
५. लिलावधारक बँकेचे जीएसटी प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.
६. फॉर्म फी भरणा केलेल्या चलनाची प्रत

ब)- प्रत्यक्ष कार्यालयास विहीत कालाधीत सादर करावयाची कागदपत्रे

१. फॉर्म फी /लिलाव शुल्क भरणा केलेल्या चलनाची मूळ प्रत
२. भाग २ मध्ये नमुद केलेल्या रकमे ऐवढी बयाणा रक्कम नोंदणीकृत बँकेच्या धनाकर्ष स्वरुपात मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, पुणे. यांचे नावे (Chief Account and Finance Officer, Zilla Parishad , Pune.)

   उपरोक्त सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती लिलावधारक बँकेच्या अधिकृत प्रतिनिधीने /प्राधिकार असलेल्या व्यक्तीने दिनांकासह साक्षांकित करुन ई लिलाव प्रणालीवर अपलोड करावेत. तथापि बयाणा रक्कमेचा धनाकर्ष (स्वतंत्र) कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (दक्षिण) निविदा शाखा जिल्हा परिषद पुणे कार्यालयात दि- ०१/०८/२०२४ वेळ दु. ०३.०० वाजेपर्यंत सादर करावेत. जे लिलावदार विहित मुदतीत लिलाव शुल्क व बयाणा रक्कमेचा मूळ धनाकर्ष सादर करणार नाहीत अशा लिलावादारांचा ई- लिलाव प्रक्रियेत मुल्यमापनाकरिता विचार केला जाणार नाही.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता** | **अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** |
| **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** |

# ई-लिलावाच्या अटी व शर्ती

१. https://eauctionzppune.in/ या संकेतस्थळावर भाग ३ प्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.
२. लिलावाच्या कार्यवाहीसाठी समिती नेमण्यात आली असून, समितीचा कार्यवाही बाबतचा निर्णय अंतिम राहील. त्यावर कायदेशीर कारवाई करता येणार नाही.
३. ई-लिलाव प्रक्रियेत सहभाग घेणे करिता लिलावधारांना त्याची संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.
४. लिलावधारांना विहित मुदतीत बीड संकेतस्थळावर सादर करणे बंधनकारक आहे लिलावधाराच्या निष्काळजीपणामुळे तो बीड सादर करू न शकल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
५. लिलावाच्या वेळापत्रकात तसेच अटी व शर्ती मध्ये बदल झाल्यास तो संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल लिलावदाराच्या निष्काळजीपणामुळे लिलाव प्रक्रियेतील बदल त्याला न कळल्यास हे कार्यालय त्यास जबाबदार राहणार नाही.
६. आवश्यक कागदपत्रांचे मूल्यमापन केल्यानंतर केवळ पात्र लिलावधारकांना लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी देण्यात येईल.
७. लिलावधारकाकडील संगणक अथवा नेटवर्कमध्ये बिघाड झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.
८. ई लिलाव दिनांक वेळ ०२/०८/२०२४ दु. ०३.०० ते दिनांक ०२/०८/२०२४ दु. ०४.०० या कालावधीत सुरू राहील.
९. सर्व लिलाव दारांना समान संधी मिळण्याकरिता लिलावाची बोली सादर करण्याचे अंतिम वेळ संपण्यापूर्वी दहा मिनिट अगोदर एखादे लिलाव बोली प्राप्त झाल्यास लिलावाची अंतिम वेळ आपोआप १० मिनिटे पुढे जाईल. ई - लिलाव विहित कालावधी व अंतिम बोली नंतर पुढील 10 मिनिटे यापैकी जे उशिरा घडेल त्यावेळेस लिलावाची बोली संपुष्टात येईल.(e-auction software नुसार)
१०. ज्या पात्र लिलावधारक बँकेने पंचायत समिती बारामती जि.पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाची इमारती चे जागेसाठी जास्तीत जास्त बोली (H१) लावली असेल अशा अर्जदारास यशस्वी अर्जदार म्हणुन घोषीत करण्यात येईल. अशा रितीने सर्वोच्च बोलीदार यशस्वी अर्जदार म्हणुन निवडण्यात येईल.
११. स्वतःच्या अटी टाकून सादर केलेले लिलाव पत्र मान्य करण्यात येणार नाही.
१२. लिलावदार बँकेने लिलाव करण्यात येणा-या इमारत/जागेची समक्ष पाहणी केली आहे असे गृहीत धरण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.
१३. ई- लिलाव प्रकिया सुरु झाले नंतर व बोली लावल्या नंतर कोणत्याही परिस्थीतीत बोली मागे घेता येणार नाही. बोली मागे घेतल्यास अथवा रदद केल्यास अर्जदाराची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. जे लिलावदार विहित मुदतीत बयाना रकमेचे मूळ धनाकर्ष सादर करणार नाहीत अशा लिलावधारांचा ई-लिलाव प्रक्रियेत विचार केला जाणार नाही.

१५. निविदा बयाना रकमेत कोणत्याही स्वरूपाची सूट लागू नाही. बयाणा रक्कम भरणे बंधनकारक आहे बयाना रक्कम न भरता ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

१६. इ लिलावात सादर केलेले दर १२० दिवसांकरिता वैध ठेवणे बंधनकारक आहे.

१७. संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कागदपत्रापैकी काही मूळ कागदपत्राची मागणी केल्यास ते तात्काळ सादर करणे बांधणकारक राहील.

१८. ई-लिलाव प्रक्रियेतील दर स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार समितीने राखून ठेवले आहेत. त्याबाबत कोणतेही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१९. ई- लिलावासंदर्भातील महाराष्ट्र शासनाचे सर्व शासन निर्णय व परिपत्रक लागू राहतील.

२०. ज्या निविदाधारकाचा दर नामंजूर होईल त्यांचे बयाणा रक्कमेचा धनाकर्ष परत केला जाईल.

२१. भाडेपट्टा करारनामा झालेनंतर भाडेपट्टा ठरविलेल्या कालावधी पूर्वी इमारत सोडावयाची असल्यास किमान ६ महिने अगोदर लेखी पूर्व सूचना देणे बंधनकारक राहील. तसेच पूर्व सूचना न दिल्यास ६ महिन्याचे आगाऊ भाडे देणे बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्तीने स्वतः पूर्णपणे वाचले असून त्या मला/ आम्हाला पूर्ण मान्य असेल बाबत स्वाक्षरी करीत असून, माझी काहीही एक तक्रार राहणार नाही.

**सही व शिक्का**

**(लिलावधारक)**

| | | |
|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **कार्यकारी अभियंता** | **अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** |
| **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** |

भाग - ५

**परिशिष्ट — १**

ई-लिलावदाराचा तपशील

१. लिलावदाराचे नांव -
२. पत्ता -
३. संस्था स्थापनेचा दिनांक -
४. लिलावदाराचा / फर्मच्या व्यापाराचे स्वरूप -
५. पॅन क्रमांक -
६. जीएसटी क्रमांक -
७. लिलावदाराचा मागील ३ वर्षाचा टर्नओव्हर वर्ष २०२०-२१ रक्कम रुपये
वर्ष २०२१-२२ रक्कम रुपये
वर्ष २०२२-२३ रक्कम रुपये
८. लिलावदाराच्या संकेतस्थळाचा तपशील -
९. लिलावदाराचा ईमेल पत्ता -
१०. लिलावदाराच्या कार्यालयाचा पत्ता -
११. लिलावदाराच्या बँकेचा तपशील मुख्य बँकेचे नाव, खाते क्रमांक व IFSC code -
बँकेचा पत्ता -
१२. लिलावदाराच्या अधिकृत प्रतिनिधीचे नांव व पदनाम -
१३. लिलावदाराचा दूरध्वनी / मोबिले नंबर -
१४. लिलावदारास काही अन्य माहिती सादर करावयाची असल्यास त्याचा तपशील —

ठिकाण - लिलावदाराची सही व
शिक्का

दिनांक -

लिलावदाराचे नांव

| | | |
|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **कार्यकारी अभियंता** | **अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** |
| **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** |

## परिशिष्ट - २

## घोषणापत्र

- मी घोषणा करतो की,पुणे जि.प.अंतर्गत पंचायत समिती बारामती अभिलेख कक्ष इमारत भाडे पटटयावर देण्याच्या ई-लिलावाच्या सर्व अटी / शर्ती मला समजल्या असून, त्या मला मान्य आहेत.

- सदर ई-लिलाव प्रक्रियेतील जागा/इमारतीस मी समक्ष भेट दिलेली असुन मी समाधानी आहे. याबाबत कोणतीही शंका/तक्रार नाही.

मी याठिकाणी घोषणा करतो की,मी सादर केलेले बीड सर्व प्रकारे बिनशर्त आहे.

ठिकाण -

लिलावदाराची सही व शिक्का

दिनांक -

लिलावदाराचे नांव

| | | |
|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **कार्यकारी अभियंता** | **अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** |
| **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** |

**३. पात्रता-**

अभिलेख कक्षाच्या इमारतीच्या वाटपासाठी खालील बँका पात्र असतील.

१. उपरोक्त ई- लिलावामध्ये पात्र खाजगी, सार्वजनिक, सहकारी बँकानाच सहभाग घेता येईल.
२. अर्जदाराने मागील तीन वित्तीय वर्षापैकी ( सन २०२०-२१ , २०२१-२२,२०२२-२३ ) किमान १ वर्षाचा Income Tax Return किंवा सनदी लेखापाल यांचेकडील आर्थिक क्षमतेबाबतचे प्रमाणपत्र.
३. बँकेचे नोंदणी प्रमाणपत्र व बँकेचे पॅन कार्ड शॉप ॲक्ट परवाना सादर करणे आवश्यक आहे.

**४. अर्ज सादर करण्याबाबत.**

१. अभिलेख कक्षाची इमारत भाडेपट्टा तत्वावर वाटप करणे करीता पात्र खाजगी, सार्वजनिक, सहकारी बँकेकडुन ई- लिलाव पध्दतीनी अर्ज मागविणेत येत आहेत.
२. बयाणा रक्कम नोंदणीकृत बँकेचे डीडीव्दारे भरणे अनिवार्य आहे.
३. अर्जात बिनचूक माहिती भरणे आवश्यक आहे. चुकीची वा अर्धवट माहीती भरल्यास व त्यामुळे अर्ज ग्राहय न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची असेल.
४. अर्ज भरण्यापूर्वी मागणी करावयाचे जागा/इमारत व त्याच आजूबाजूचा परिसर, क्षेत्रफळ समक्ष पहावे. अभिलेख कक्ष आहे त्या स्थितीत वाटप करावायाचे आहे. नंतर या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणारा नाही.
५. अर्जदाराने आपले संपूर्ण पत्ता , ई. मेल, भ्रमणध्वनी क्र. अर्जामध्ये लिहावा, ईमेलव्दारे / नमूद पत्यावर पाठवीलेले पत्र अर्जदारास मिळाले आहे. असे गृहीत धरण्यात येईल.
६. सर्व कागदपत्रे सुस्पष्ठ दिसतील अशा पध्दतीने अपलोड करावीत.

**५. <u>अर्ज उघडणे स्विकृती व वाटपपत्र-</u>**

१. जाहीरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्रतेनंतर निश्चित केलेल्या दिवशी ई. लिलाव ( Live) प्रक्रियेत सहभागी व्हावे. या दिवशी काही अपरिहार्य कारणामुळे/ परिस्थितीमुळे ई. लिलाव ( Live) प्रक्रिया रद्द झाल्यास पुढील दिनांक कळविणेत येईल.

२. अर्जदाराने पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे Upload करणे आवश्यक आहे.

३. ज्या पात्र अर्जदाराने पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाची इमारत चे जागेसाठी जास्तीत जास्त बोली लावली असेल अशा अर्जदारास यशस्वी अर्जदार म्हणून घोषित करण्यात येईल. अशा रितीने सर्वोच्च बोलीदार यशस्वी अर्जदार म्हणून निवडण्यात येतील.

४. कोणत्याही अर्जात स्वत:च्या काही पूर्व अटींचा उल्लेख असल्यास असा अर्ज स्विकारला जाणार नाही.

५. ई. लिलाव ( Live) प्रक्रिया सुरु झाले नंतर व बोली लावल्यानंतर कोणत्याही परिस्थीतीत बोली मागे घेता येणार नाही. बोली मागे घेतल्यास रद्द केल्यास अर्जदाराची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

६. अर्ज स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार पुणे जिल्हा परिषद पुणे यांचा राहील.

७. पुणे जिल्हा परिषद पुणेने ठरवून दिलेल्या पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाची इमारतच्या भाडेकरार रकमेच्या ६महिण्याचे भाडे रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागणार आहे. तसेच सदर रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही.

८. सर्वात जास्त बोली धारक वगळता इतर सर्व अर्जदारांची बयाणा रक्कम विनाव्याज पर केली जाईल.

**७. पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाच्या इमारतीचे अधिमूल्य भरणा करावयाच्या अटी व शर्ती -**

१. पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाच्या इमारतीच्या दर्शविण्यात आलेल्या अधिमुल्यामध्ये वाढ करण्याचा अधिकार राहील.

२. **अभिलेख कक्ष इमारतीकरीता** भाडे दरमहा भरण्याची पध्दत-

यशस्वी अर्जदाराची पात्रता निश्चित झाल्यावर अभिलेख कक्षाच्या मासिक भाडयाचा हप्ता निश्चीत करून पुढील वेळापत्रकानुसार भरावयाचे आहे.

अ. ई-लिलावानुसार यशस्वी लिलाव धारकाने सदर इमारतीचे भाडे आगाऊ स्वरुपात दर महिन्या च्या ५ तारखेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे.

आ. इमारतीचे भाडे विहीत मुदतीत जमा न केलेस त्यावर विलंब व्याज आकारणी द.सा.द.शे. १२% प्रमाणे केली जाईल. सदर व्याज आकारणी किमान ३० दिवसांकरीता केली जाईल.

३. बयाणा रकमेबाबत-

अ. यशस्वी अर्जदाराने अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेली बयाणा रक्कम जप्त केली जाईल.

ब. अर्जदार अर्जामध्ये यशस्वी ठरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास अथवा अर्जदार अंतिमत: अपात्र ठरला तर त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

४. सर्वोच्च बोली धारकाने विहीत मुदतीत व्यवसाय परवाना सादर न केल्यास वाटपपत्र रद्द करून भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

**८. अभिलेख कक्ष इमारत व परिसर लिलावाबाबतच्या इतर महत्वाच्या अटी-**

१. पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाची इमारतीचे अधिमुल्य ताप्तुरते असून त्यामुध्ये बदल झाल्यास बदलेलेली अधिमुल्य यशस्वी अर्जदारास कळविण्यात येईल. तसेच सदर अभिलेख कक्षाचे इमारतीस अपेक्षित बोली लगली नाही. तर सर्वोच्च बोली नाकारण्याचा अधिकार पुणे जिल्हा परिषद पुणेस राहील.

२. यशस्वी अर्जदाराने संपूर्ण रक्कम भरुन कार्यालयास अदा केल्यानंतर १ महिन्याच्या आत भाडेपट्टा करून घेणे बंधनकारक राहील.

३. ई- लिलावात नमुद केलेले भाडेपटटादर हे निव्वळ असल्यामुळे त्यावर नियमानुसार वस्तु व सेवा कर (GST) अधिक लागु राहिल.

४. नगर परिषदेचे मालमत्ता कर भरण्याची जबाबदारी ही पंचायत समिती बारामती यांची राहील.

५. नगर परिषदेची पाणीपट्टी, मलनिस्सारण आकार, वीज आकार इ. त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील सदर इमारतीसाठी देय असणारे किंवा होणारे सर्व कर, उपकरण व लेव्ही शासकीय कर इ. ताबा मिळालेनंतर वेळोवेळी योग्य सरकारी निमसरकारी तसेच स्थानिक प्राधीकृत कार्यालयात भरण्याची जबाबदारी यशस्वी अर्जदारावर राहील.

६. या माहीती पुस्तिकेत दिलेल्या तपशील परिपूर्ण नाही तो फक्त निदर्शक आहे. उपरोक्त अभिलेख कक्ष इमारतीच्या वितरणाच्या अटी व शर्ती यशस्वी अर्जदारांना वेळोवेळी कार्यालयाव्दारे कळविल्या जातील व त्या यशस्वी अर्जदारास बंधनकारक राहतील.

७. यशस्वी व पात्र ठरलेल्या अर्जदाराच्या कागदपत्रांची फेरतपासणी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद पुणे यांना असून त्यामुध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा यशस्वी अर्जदारास केलेले वितरण रद्द करण्यात येईल.

८. शासनाच्या सुधारीत धोरणानुसार सदर इमारतीच्या अधिमुल्यावर लागणारा सेवा कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर भाडेधारकांना भरावे लागतील.

९. यशस्वी अर्जदाराने सदर अभिलेख कक्षाची इमारत पाहून घ्यावीत व त्याबाबतची पूर्ण माहीती अर्ज करण्यापुर्वी अवगत करुन घ्यावी त्याबाबतची कोणतीही तक्रार नंतर ऐकून घेतली जाणार नाही वाटप पत्र रद्द करता येणार नाही.

१०. सदर इमारतीतील , स्वच्छतागृहे सामाईक वापराच्या जागा वगैरेची स्वच्छता, देखभाल, दुरुस्ती वगैरे बाबींची जबाबदारी भाडेधारकाची राहील.

११. यशस्वी अर्जदाराची प्राधिकरणाच्या लेखी पुर्व परवानगी शिवाय सदर इमारतीमध्ये कसलाही फेरफार दुरुस्ती अगर वाढ अगर कोणत्याही प्रकारचा बांधकामाचा बदल करता येणार नाही. जर भाडेधारकाने एकदा वाटप केलेल्या जागेच्या बांधकामामध्ये परस्पर बदल केल्यास अथवा

जास्तीची जागा  व्यापल्याचे आढळल्यास वाटप रद्द करून सदर जागा ताब्यात घेण्याचे अधिकार  मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद पुणे यांना राहतील.

१२. यशस्वी अर्जदाराने त्यास कळविलेली पूर्ण रक्कम भरल्यानंतर पुणे जिल्हा परिषद पुणे बरोबर करारनामा करावा लागेल. या करारनाम्याचा तपशील पुणे जिल्हा परिषद पुणे ठरवेल त्यानुसार असेल, यासाठी येणारा टंकलेखन , स्टॅम्पडयुटी, नोंदणी फी, इ. अनुषंगीक सर्व खर्च यशस्वी अर्जदरास करावा लागेल.

१३. यशस्वी  अर्जदारास अर्जात नमूद केलेला  व्यवसाय स्वत:च सुरु  करावा व चालू ठेवावा लागेल इतर कोणासही पोटभाडयाने कराराने किंवा अन्य कोणत्याही मार्गाने पूर्ण किंवा काही भाग चालविण्यास  अगर वापरण्यास देता येणार नाही .

१४.यशस्वी अर्जदारस व्यवसायीक इमारतीचा कोणत्याही कारणाने वापर बदलावयाचा असेल तर त्यासाठी पुणे जिल्हा परिषद पुणेची लेखी पूर्व अनुमती घेणे आवश्यक आहे. अशी परवानगी पुणे जिल्हा परिषद पुणे  वेळोवेळी ठरवेल त्या नियमानुसार  व विहीत रक्कम भरणा केल्यावर देण्यात येईल. परस्पर वापर बदल्याचे निदर्शनास आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

१५. सदर इमारतीचा भाडे करार जास्तीत जास्त  १० वर्ष पर्यंत वाढविता येईल व दर तीन वर्षांनी नोंदणीकृत भाडे करार  एक दिवसाचा खंड देऊन नव्याने करणे बंधनकारक राहील.१० वर्षानंतर नुतनीकरणाबाबत द्विपक्षीय समन्वयाने निर्णय घेण्यात येईल.

१६. ताबा दिनांकपासुन प्रति तीन वर्षाला १५%  भाडेवाढ करण्यात येईल.

१७.वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग केल्यास चुकीची माहीती दिल्यास कोणत्याही टप्प्यावर अथवा वाटपानंतरही सदर जागेचे वाटप रद्द केले जाईल व पुणे जिल्हा परिषद पुणे सदर इमारतीचा ताबा परत घेईल.

१८. नमूद केलेल्या अटी नियमामध्ये कोणत्याही वेळी  पुणे जिल्हा परिषद पुणेस योग्य वाटेल तो फेरबदल करणे, रद्द करणे, त्यात दुरुस्ती करणे किंवा नवीन अटी किंवा नियम यांचा समावेश करणे यांचे पूर्ण अधिकार  पुणे जिल्हा परिषद पुणेस आहेत. हा अधिकार पुणे जिल्हा परिषद पुणे  योग्य वाटेल त्यावेळी वापरू शकेल. अशारितीने  बदलण्यात आलेले , रद्द केलेले, दुरुस्ती केलेले तसेच नवीन केलेले नियम व अटी यशस्वी अर्जदारावर बंधनकारक राहतील.

१९. या माहीती पत्रकातील नियम व अटी यांचे अर्थबोधाबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय पुणे जिल्हा परिषद पुणेचा राहील व तो यशस्वी  अर्जदारावर बंधनकारक राहील.

| | | |
|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **कार्यकारी अभियंता** | **अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** |
| **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** | **पुणे जिल्हा परिषद ,पुणे.** |

**सावधानतेचा इशारा**

पुणे जिल्हा परिषद पुणे अंतर्गत पंचायत समिती बारामती जि. पुणे परिसरातील नव्याने बांधकाम पुर्ण झालेल्या अभिलेख कक्षाची इमारत वाटपाच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतीनिधी / सल्ला देणार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तींशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला पुणे जिल्हा परिषद,पुणे जबाबदार राहणार नाहीत. तसेच अर्जदारास कोणी दलाल/ व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा प्राधिकरणाच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबीं करताना आढळल्यास या कार्यालयास पुढील दुरध्वनीवर कळवावे.

दुरध्वनी क्र.